बुलढाणा | परभणी | अकोला | वाशिम | जालना | संभाजीनगर | बीड | नाशिक | पुणे | ठाणे | मुंबई | यवतमाळ | अमरावती

दैनिक
आपल्या हक्काचे दैनिक
RNI : MAHMAR/2022/87884

# सेवाशक्ती टाईम्स

निष्पक्ष | मार्गदर्शक संपादक : गजानन गारोळे | आपल्या सोबत
आपल्या हकासाठी... आपल्या सोबत !

https://www.sewashaktitimes.com
मुख्य संपादक : अंकोश जानू राठोड 9011509831
कार्यकारी संपादक : गजानन सरकटे 8605433822
Email: ankoshrathod25@gmail.com

## लाडकी बहीण योजना बंद करणार? ही "विश्वासघातकी सरकार"
## रोहित पवार यांच्या दाव्याने राज्यभर खळबळ

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**




मुंबई : पंतप्रधान उज्ज्वला योजनेतंर्गत एक मोठा निर्णय घेण्यात आल्याने कोट्यवधी लाभार्थ्यांना धक्का बसला आहे. पंतप्रधान उज्ज्वला योजनेतंर्गत एलपीजी सिलेंडरची वार्षिक मर्यादा ९ वरून आता डायरेक्ट ४ करण्यात आली आहे. यामुळे देशातील कोट्यवधी लाभार्थी हे नाराज झाले आहेत. पूर्वी ९ सिलेंडरवर सबसिडी देण्यात येत होती, मात्र आता ती संख्या फक्त ४ असेल. याच मुद्यावरून आता विरोध कांनीही सरकारवर टीका केली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते, आमदार रोहित पवार यांनी या संदर्भात X ( पूर्वीचे ट्विटर) वर एक पोस्ट केली आहे. सरकारने उद्या उज्ज्वला योजनाच सरकारने गुंडाळली तर आश्चर्य वाटणार नाही, असाच प्रकार मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबाबीतही घडू शकतो, असा इशाराच एकप्रकारे रोहित पवार यांनी दिलं आहे. त्यांच्या या दाव्याने मोठी खळबळ माजली आहे. २०१६ साली पंतप्रधान उज्ज्वला योजना सुरु करण्यात आली होती. या योजने अंतर्गत लाभार्थ्यांना १४.२ किलोचे १२ एलपीजी सिलेंडरवर सबसिडी मिळत होती. मात्र त्यानंतर ही संख्या कमी होऊन ९ इतकी झाली. तर आता नवीन निर्णयानुसार, त्यात आणखी कपात करण्यात आली असून या योजनेच्या लाभार्थ्यांना वर्षभरात केवळ ४ सिलेंडरवरच सबसिडी देण्यात येणार आहे.

> **काय म्हणाले रोहित पवार ?**
> उज्ज्वला योजनेतील अनुदानित गॅस सिलिंडरची संख्या १२ वरुन आधी ९ केली आणि आता ९ वरुन थेट ४ करण्यात आली. उद्या ही उज्ज्वला योजनाच सरकारने गुंडाळली तर आश्चर्य वाटणार नाही. असाच प्रकार लाडक्या बहिणींच्या बाबतीतही सुरु आहे. निवडणुकीत मतांची बेगमी होताच सरसकट लाभ दिल्यानंतर आता वेगवेगळे निकष लावून ८० लाख लाडक्या बहिणींना योजनेतून बाहेर काढण्यात आलं. उद्या आणखी निकष लावून हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ दिला जाईल किंवा ही योजनाही अशीच बंद केली जाईल." असं रोहित पवार यांनी पोस्टमध्ये म्हटलंय.

## साखरपुड्यासाठी निघालेल्या कुटुंबावर काळाचा घाला
## कार-बाइक आणि एसटीचा अपघात, ६ जणांचा मृत्यू

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**



जळगाव : धुळे-अमळनेर रस्त्यावरील मंगरूळ गावाजवळ आज सकाळी ७ च्या सुमारास तिहेरी अपघात झाला. एसटी बस, कार आणि मोटारसायकल यांच्यात झालेल्या या जोरदार धडकेत तब्बल ६ जणांचा मृत्यू झाला. गुजरातहून अमळनेरकडे साखर पुड्याच्या कार्यक्रमासाठी येणाऱ्या महाजन कुटुंबावर काळाने घाला घातला असून, या अपघातात एकाच कुटुंबातील ५ जणांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

**साखरपुड्याचा आनंद क्षणात विरला!**

तिन्ही वाहनांची धडक इतकी भयंकर होती की, वाहनांचा अक्षरशः चेंदामेंदा झाला असून एक निष्पाप लहान मुलगा कारमध्येच अडकला होता. मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातमधील महाजन कुटुंब अमळनेर इथे एका साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी येत होते. त्यांची (GJ १९ AF ३१४७) क्रमांकाची कार धुळ्याकडून अमळनेरच्या दिशेने येत असताना, समोरून अमळनेरकडून धुळ्याकडे जाणाऱ्या एसटी बस आणि मोटार सायकलशी हॉटेल वृंदावनजवळ कारची समोरासमोर जोरदार धडक झाली.

**अपघातातील मृतांची नावं!**

या भीषण अपघातात कारमधील महिला आणि पुरुषांसह धरणगाव येथील एक मोटारसायकल स्वार जागीच ठार झाला. मृतांमध्ये गुजरातच्या व्यारा येथील एकाच कुटुंबातील ५ जणांचा समावेश आहेः १. आदित्य चंद्रकांत महाजन (रा. व्यारा, गुजरात). २. अनिता सुरेश महाजन (रा. व्यारा, गुजरात). ३. निर्मला नंदलाल महाजन (रा. व्यारा, गुजरात). ४. नंदलाल गोपाल महाजन (रा. व्यारा, गुजरात). ५. सुरेश विक्रम महाजन (रा. व्यारा, गुजरात). ६. धरणगाव येथील मोटारसायकल स्वार (नाव अद्याप समजू शकलेले नाही)

**चिमुकला कारमध्ये अडकला!**

धडकेनंतर कारचा पुढचा भाग पूर्णपणे चेपला गेला, ज्यामध्ये एक लहान मुलगा गंभीर अवस्थेत अडकून पडला होता. या तिहेरी अपघातात एसटी बसमधील प्रवासी दीपक दिलीप पाटील हे देखील गंभीर जखमी झाले आहेत.

## बिबट्या पतीचा जीव घ्यायला आला, पण पत्नीने वार केला अन्...; विदर्भातील थरारक घटना

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**



सिंदेवाही (चंद्रपूर) : पळसगाव जाट येथे रविवारी (दि. ७) सकाळी शेतात काम करत असताना बिबट्याने शेतकऱ्यावर अचानक हल्ला केला. या थरारक घटनेत पत्नीने दाखवलेल्या प्रसंगावधान आणि धाडसामुळे पतीचा जीव वाचला आणि मोठी दुर्घटना टळली. पळसगाव जाट येथील स्मशान भूमी जवळील शेतात महेंद्र मेघश्याम गायकवाड (वय ४५) हे पत्नी पौर्णिमा गायकवाड यांच्यासोबत सकाळी शेतीची कामे करीत होते. त्याचवेळी झुडपात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्यावर झडप घातली.क्षणात घडलेल्या या घटनेने एकच गोंधळ उडाला, पतीवर बिबट्याचा हल्ला होताच पौर्णिमा गायकवाड यांनी क्षणाचाही विलंब न करता हातातील फावड्याने बिबट्यावर जोरदार वार केला. या अनपेक्षित प्रतिकारामुळे बिबट्याने काही काळासाठी माघार घेतली. मात्र, काही क्षणातच बिबट्याने पुन्हा महेंद्र गायकवाड यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न केला असता, पत्नीने पुन्हा धैर्य दाखवत त्याला प्रतिकार केला आणि पतीला सुरक्षित दूर नेले. त्यांच्या या असामान्य शौर्यामुळे महेंद्र गायकवाड यांचा जीव वाचला.




## पंतप्रधानपदाचा चेहरा ठरवा, इंडिया आघाडीच्या बैठकीत ठाकरेंची भूमिका
## इंडिया आघाडीतील बैठकीत खासदार संजय राऊत यांनी मांडली अशी भूमिका

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

मुंबई : इंडिया आघाडीची राजधानी दिल्लीमध्ये बैठक पार पडली. या बैठकीत कॉंग्रेस, ठाकरे यांची शिवसेना तसेच इतर महत्त्वाच्या पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. दरम्यान, या बैठकीत एकूण पाच मुद्द्यांवर विरोधी पक्षांची सहमती झाल्याचे समोर आले आहे. तसेच आगामी ऑगस्ट महिन्यात पुन्हा एकदा इंडिया आघाडीची बैठक पार पडेल, असेही सांगण्यात आले आहे. याच बैठकीत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांनी पंतप्रधानपदाचा उमेदवारी निवडला पाहिजे, अशी भूमिका मांडली आहे. खासदार संजय राऊत यांनी याविषयी सविस्तर माहिती दिली. कॉकरोच जनता पार्टीचे दिल्लीत आंदोलन झाले. याविषयी बैठकीत काही चर्चा झाली का? असेही संजय राऊत यांना विचारण्यात आले. या प्रश्नाचे उत्तर देताना, "अनेकांनी कॉकरोच जनता पार्टीविषयी आपली मतं मांडली. देशातील तरुणांत रोष आहे. हा रोष व्यक्त करण्यासाठी कॉकरोच जनता पार्टी हा मंच तरुणांना मिळत आहे. परंतु कॉंग्रेस पक्षाने यापेक्षाही अनेक मोठी आंदोलनं केली आहेत. अनेक राज्यांत हे आंदोलन सुरू आहे. नीटच्या प्रकरणात लाठीहल्ले झाले आहेत. अश्रूधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. तरीदेखील आपण रस्त्यावर उतरू आणि आंदोलन करू, असे सगळ्यांचे मत आहे," अशी महत्त्वाची माहिती संजय राऊत यांनी दिली.इंडिया आघाडीची पुढची बैठक ही हैदराबादमध्ये आयोजित करण्यात येणार असल्याचे राऊत यांनी सांगितले. ऑगस्ट महिन्यात इंडिया आघाडीची बैठक घेण्याचे नियोजन असल्याचे राऊत म्हणाले.

**आपण पंतप्रधानपदाचा चेहरा निवडला पाहिजे!**

सत्ता आम्हाला हवी आहे, हे सांगितलं तर तुमचा पंतप्रधानपदाचा चेहरा कोण, असं लोक विचारतात. म्हणूनच आपण पंतप्रधानपदाचा चेहरा निवडला पाहिजे, असे उद्धव ठाकरे यांचे मत आहे. लोकांपुढे हा चेरहा येऊ दिला पाहिजे. देशाचं नेतृत्व करणारा हा आमचा चेहरा आहे, असे आपण लोकांना दाखवले पाहिजे, असेही मत ठाकरे यांनी मांडले. महागाई, घोटाळे, बेरोजगारी असेही काही मुद्दे आहेत. परंतु उद्धव ठाकरे यांनी या बैठकीत एकूण तीन मुद्दे मांडले, अशी माहिती संजय राऊत यांनी दिली.

**इंडिया आघाडीची पुढची बैठक!**

इंडिया आघाडीतील बैठकीत एक आराखडा ठरला आहे. या बैठकीत ठरल्याप्रमाणे भारताच्या सरन्यायाधीशांना एक पत्र लिहिले जाणार आहे. त्यात एसआयआरचा विषय असेल. नीट पेपरफुटीचा विषय असेल, विषयी लिहिले जाणार आहे. इंडिया आघाडीची पुढची बैठक ऑगस्ट महिन्यात घेण्याचेही ठरले आहे. ती बैठक हैदराबाद येथे होईल. दीड महिन्यांत आम्ही वारंवार भेटत राहू, यावरही आमचे एकमत झाले आहे, असे संजय राऊत यांनी सांगितले.

**इंडिया आघाडीच्या बैठकीत शिवसेनेने कोणते मुद्दे मांडले?**

महागाई, बेरोजगारी आणि घोटाळे या मुद्द्यांवरही शिवसेना पक्षाच्या वतीने मत मांडण्यात आले. इंडिया आघाडीच्या वतीने बैठकीत अंतिम आराखडा ठरला त्याप्रमाणे देशाच्या सर्वोच्च न्यायाधीशांना पत्र लिहून महत्वाच्या मुद्द्यांकडे त्यांचे लक्ष वेधायचे आहे. एसआयआर, नीटसारख्या विषयात सर्वोच्च न्यायालयाचे लक्ष वेधण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे संजय राऊत यांनी सांगितले.

## माझ्या भावाचा काय दोष? कुटुंब सावरणाऱ्या २५ वर्षीय नियाजचा बेस्ट बस अपघातात अंत, भावंडांचा बांध फुटला

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**



मुंबई : 'माझ्या भावाचा काय दोष? तो पोटापाण्यासाठी, कुटुंबाला आधार देण्यासाठी मुंबईत आला. दीडच महिन्या पूर्वी त्याने हे नवीन काम सुरु केले होते. त्याच्या आई-वडिलांना आता काय सांगायचे? अशी विचारणा करताना बेस्ट अपघातात मृत्युमुखी पडलेल्या नियाज अहमद (२५) याच्या चुलत भावाच्या अश्रूंचा बांध फुटला. या अपघातात आमचा दोष काय ? वारंवार होणाऱ्या अपघातांतून बेस्ट धडा घेणार का? असे प्रश्न नियाजच्या कुटुंबीयांसाह जखमींच्या नाते वाइकांकडून विचारले जात आहेत.

**कुटुंबाला आधार देणारा लेक!**

अनियंत्रित बेस्ट बसच्या धडकेमध्ये नियाजला नाहक जीव गमवावा लागला. तो उत्तर प्रदेशच्या बहराइच या गावातील रहिवासी होता. महिनाभरापूर्वी त्याने 'स्विगी'मध्ये डिलिव्हरी बॉयचे काम सुरु केले होते. डिलिव्हरी केल्या जाणाऱ्या पार्सलनुसार त्याला पैसे मिळायचे. नियाज वरळी येथे भाड्याच्या घरात त्याच्या मित्रासोबत राहत होता. पाचेक वर्षांपासून त्याने मुंबईमध्ये विविध प्रकारची कामे केली.

**२१ वर्षांच्या ऋषभची मृत्यूशी झुंज!**

या अपघातात २१ वर्षीय ऋषभ गुप्ता हादेखील गंभीररित्या जखमी झाला आहे. त्याच्या डोक्याला इजा झाली असून, तो मृत्यूशी झुंज देत आहे. ऋषभवर महा पालिकेच्या शीव येथे अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत. त्याची प्रकृती चिंता जनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. महापौर रितू तावडे, बेस्ट समितीच्या अध्यक्ष तृष्णा विश्वासराव यांनी रुग्णालयात भेट देऊन ऋषभच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच, त्याची आई रामा गुप्ता, इतर नाते वाइकांही भेट घेऊन धीर दिला.

## प्रत्येक जिल्ह्यात सीईटी सेलचे विद्यार्थी सहाय्यता केंद्र - चंद्रकांतदादा पाटील

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**



मुंबई : राज्यातील विद्यार्थ्यांना सीईटी परीक्षा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया ( CAP ), शिष्यवृत्ती योजना आणि प्रवेश प्रक्रिया संदर्भात अचूक माहिती योग्य मार्गदर्शन त्यांच्या जिल्ह्यातच उपल व्हावे, यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात 'सीईटीसेलचे विद्यार्थी सहाय्यता केंद्र' सुरु करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे, अशी घोषणा उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केली आहे. मंत्रालयात उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. यावेळी उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणु गोपाल रेड्डी, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, डॉ. विनोद मोहितकर, शैलेंद्र देवळाणकर तसेच जिल्हा स्तरीय समन्वयक ऑनलाइन उपस्थित होते. या बैठकीत सर्व जिल्ह्यातील सीईटी विद्यार्थी सहाय्यता केंद्राचा आढावा घेण्यात आला.

**जिल्ह्यातच मार्गदर्शन मिळणार – चंद्रकांतदादा पाटील!**

उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावर विश्वासार्ह माहिती, अचूक मार्गदर्शन सहजपणे त्यांच्या जिल्ह्यातच उपल व्हावे यासाठी विद्यार्थी सहाय्यता केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. तसेच ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील कामां साठी वारंवार मोठ्या शहरांमध्ये जाण्याची आवश्यकता भासू नये, त्यांना प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती, विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती तसेच आवश्यक मार्गदर्शन त्यांच्या जिल्ह्यातच उपल व्हावे, या हेतूने ही केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये एकूण ४० सीईटी विद्यार्थी सहाय्यता केंद्रे सुरु करण्यात येत असून मुंबईत तीन, पुण्यात दोन आणि नागपुरात दोन केंद्रे असतील. यापैकी २६ केंद्रांचे काम पूर्ण झाले असून सहा केंद्रे अंतिम टप्प्यात आहेत. उर्वरित आठ केंद्रेही कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

# शेतकऱ्यांना पीक विमा मिळून देण्यास शिवसेने च्या पाठपुराव्याला यश

## पीक विमा मिळणार

**सेवाशक्ती टाईम्स.**
**रविंद्र राठोड.**

नांदेड : माहूर व किनवट तालुक्यासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील सन २०२५ - २६ खरीप हंगामातील सोयाबीन पिक विमा पासून वंचित राहिलेल्या मंडळातील शेतकऱ्यां साठी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रवि भाऊ राठोड. यांनी संबंधित सर्व प्रशासनासह माननीय नामदार श्री.हेमंत भाऊ पाटील यांच्याकडे पाठपुरावा करत संसद रत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्याकडे शिव संवाद दौरे दरम्यान हदगाव येथे पिक विमा संदर्भात सविस्तरपणे मांडणी करून शेतकऱ्यांना पिक विमा मिळवून देण्यासाठी विनंती केल्याने शेतकऱ्यांच्या विषयाचं गांभीर्य लक्षात घेऊन पाठपुरावा करत अखेर वंचित सर्व शेतकऱ्यांना पिक विमा मंजूर करण्यास भाग पाडले. माहूर तालुक्यातील सोयाबीन पीक विमास पात्र असलेल्या शेतकऱ्यांचा पीक कापणी प्रयोगात उंबरठा उत्पन्न दाखवणाऱ्या मंडळातील पीक कापणे प्रयोगांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाईचे आदेश; शेतकऱ्यांना लवकरच भरपाई मिळणारखरीप हंगाम २०२५-२६ मधील सोयाबीन पीक विमा भरपाई संदर्भातील प्रलंबित प्रकरणांना आता गती मिळण्याची चिन्हे दिसत असून, माहूर तालुक्यातील पीक कापणी प्रयोगांमध्ये झालेल्या त्रुटीं प्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी याबाबतचे अधिकृत पत्र जारी केले आहे. शिवसेने चे नांदेड जिल्हा सह संपर्कप्रमुख रवि उत्तमराव राठोड यांनी दिलेल्या निवेदनानंतर प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची दखल घेत कार्यवाही सुरू केली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२५ पासून नुकसान भरपाई ही उत्पन्न आधारित पद्धतीने देण्यात येत आहे. जिल्ह्यातील १३ महसूल मंडळांपैकी ५ महसूल




मंडळांतील सोयाबीन पीक विमाधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मंजूर झाली असली, तरी उर्वरित ८ महसूल मंडळांतील प्रकरणे तांत्रिक कारणांमुळे प्रलंबित होती. माहूर तालुक्यातील चार महसूल मंडळां मध्ये झालेल्या पीक कापणी प्रयोगांवर विमा कंपनीने आक्षेप घेतले होते. यामुळे हजारो शेतकऱ्यांची नुकसान भरपाई रखडली होती. या पार्श्वभूमीवर २९ मे २०२६ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षते खाली जिल्हा स्तरीय सुनावणी समितीची बैठक घेण्यात आली. बैठकीत संबंधित प्रकरणांची सविस्तर सुनावणी घेण्यात आली असून, विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई निश्चितीची प्रक्रिया वेगाने सुरू करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.दरम्यान, पीक कापणी प्रयोगामध्ये हलगर्जी पणा किंवा चुका केल्याचे आढळून आल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट आदेश प्रशासनाने दिले आहेत. उर्वरित महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना लवकरात लवकर विमा भरपाई मिळावी यासाठी कृषी विभाग आणि विमा कंपनी स्तरावर समन्वयाने कार्यवाही सुरू असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.या निर्णयामुळे पीक विमा भरपाईच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाच्या भूमिकेकडे जिल्ह्याचे लक्ष होते.आत्ता मात्र पीक विमा भरलेल्या शेतकऱ्यांना लवकरच सोयाबीन पकाची नुकासान भरपाई चा लाभ मिळणार आहे. यावेळी शिवसेनेचे नांदेड जिल्हा सहसंपर्क प्रमुख रविभाऊ राठोड यांनी माध्यामाशी बोलातंना सांगितले की शिवसेना पक्ष हा नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहतो ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हाच शिवसेना पक्षाचा धोरण असून एकनाथ भाई शिंदे साहेब चा दिल्लीतला नेता ते गल्लीतला कार्यकर्ता हा नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असणार असल्याचे यावेळी रविभाऊ राठोड यांनी बोलताना सांगितले व पुढे बोलताना म्हणाले कीशेतकऱ्याना न्याय मिळवून देण्यासाठी ज्यांनी ज्यांनी बातमी प्रसारित केली अस्या सर्व वृत्तपत्र, वृत्त वाहिन्यांच्या प्रतीनिधीनचे आभार मानले आहे. तसेच शिवसेनेचे जिल्हा प्रमुख विवेक जी देशमुख, तालुका प्रमुख सुदर्शन नाईक, बालाजी मुरकुटे, मनोज तिरमणवार, विशाल जाधव, मेरसिंग पवार, जयपाल जाधव, सागर रुणवाल. या सर्व शिव सैनिकांच्या व पदाधिकाऱ्यांच्या प्रयत्नाने शेतकरी सुखावला आहे.




**बळीराम पाटील मिशन मांडवी संचलित श्री रेणुकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, श्रीक्षेत्र माहूर येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकच्या उन्हाळी परीक्षा २०२६ सुरू आहेत. या परीक्षेदरम्यान बी.कॉम. तृतीय वर्षात प्रवेशित असलेली विद्यार्थिनी माधुरी कोंडबा पाटोडे ही आपल्या तान्हुल्या बाळासह परीक्षा केंद्रावर उपस्थित राहून परीक्षा देत आहे. आईची परीक्षा पूर्ण होईपर्यंत बाळाची काळजी त्याची आजी घेत आहे. मातृत्वाची जबाबदारी सांभाळत शिक्षणाची जिद्द, चिकाटी आणि ध्येयपूर्तीची प्रेरणादायी कहाणी म्हणजे माधुरी पाटोडे यांचा हा प्रवास. शिक्षणासाठीची तिची जिद्द इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रफुल्लजी राठोड यांनी व्यक्त केले.**




**मेहकर येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्राचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांचा नायब तहसीलदार अजय पिंपरकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी महसूल अधिकारी कैलास सोनुने यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते.**

ISO 9001:2008
RHM
ISO 9001:2008
# राठोड हॉस्पीटल मल्टीस्पेशालीटी
बालाजी नगर, डोणगाव रोड, हॉटेल मँगो मागे, मेहकर, जि. बुलढाणा मो. 8484815815

**सर्जरी विभाग**
- एंडोस्कोपी, लॅप्रोस्कोपी, युरो सर्जरी, जनरल सर्जरी, बर्न युनिट
- दुर्बिणद्वारे पोटाच्या शस्त्रक्रिया, पित्ताशय काढणे, अपेन्डीक्स काढणे
- थॉयरॉईड (गलगंड) उपचार व शस्त्रक्रिया
- स्तनाच्या गाठी व कॅन्सरचे उपचार
- कॅन्सर निदान व उपचार
- लहान व मोठ्या आतड्याचे विकार व कॅन्सर उपचार

**अतिदक्षता विभाग**
- हृदयविकार (हार्ट अटॅक)
- उच्च रक्तदाब (हाय ब्लडप्रेशर)
- मधुमेह व त्या संबंधित होणारे दुष्परिणाम

**मेडिसिन विभाग**
- लठ्ठपणा व त्या संबंधित आजार
- थायरॉईड ग्रंथीचे आजार
- क्षयरोग, दमा, न्युमोनिया व इतर फुफ्फुसांचे आजार
- अर्धांगवायु, फिट व इतर मेंदुविकार
- सर्पदंश व विषबाधा
- टायफॉईड, मलेरिया, डेंग्यू व इतर संसर्गजन्य आजार
- रक्तविकार, पेशी कमी जास्त होणे

**कान-नाक-घसा विभाग**
- कानाच्या पडद्याची शस्त्रक्रिया, बधिरपणा निदान व उपचार
- ऑडिओमेट्री, नाकाच्या हाडाची शस्त्रक्रिया, ॲलर्जी उपचार
- नाकातील कोंब काढणे, टॉन्सिल संबंधित शस्त्रक्रिया, मानेतील गाठीचे उपचार
- दुर्बिणद्वारे कान व नाकाच्या शस्त्रक्रिया व तपासणी
- तोंडाच्या कॅन्सरचे निदान व उपचार

**स्त्रीरोग व प्रसुती विभाग**
- वेदनारहित प्रसुती, सरकारमान्य गर्भपात केंद्र, दुर्बिणद्वारे बिनटाक्याची कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया
- अत्याधुनिक वातानुकुलीत प्रसुतीगृह
- गर्भपिशवीचे बिनटाक्याचे व दुर्बिणद्वारे शस्त्रक्रिया
- अत्याधुनिक वंध्यत्व निवारण केंद्र
- कॅन्सरचे निदान व उपचार
- वंध्यत्व निदान व उपचार

**मूळव्याध व क्षारसूत्र विभाग**
- बिना शस्त्रक्रिया मूळव्याध उपचार (इंजेक्शन थेरपी, रेडिओथेरपी, क्रायोसर्जरी, क्षारसूत्र)
- फिशर, भगंदर निदान व उपचार

**अस्थिरोग विभाग**
- अपघात विभाग, ट्रॉमा केअर सेंटर, फ्रॅक्चर उपचार, अस्थि, सांधे व पाठीच्या मणक्याचे उपचार व शस्त्रक्रिया
- दुर्बिणीद्वारे सांध्याच्या शस्त्रक्रिया
- मणक्यांचे आजार व शस्त्रक्रिया
- कृत्रिम सांधेरोपण (जॉईंट रिप्लेसमेंट) शस्त्रक्रिया
- सांधेवाताचे उपचार व फिजियोथेरपी


**किडणी विकार विभाग**
- मुतखडा व प्रोस्टेटचे दुर्बिणद्वारे शस्त्रक्रिया
- दुर्बिनद्वारे किडणीतील खड्याची शस्त्रक्रिया (PCNL)
- लेझरद्वारे मुतखड्याच्या बिनटाक्याच्या शस्त्रक्रिया

**एंडोस्कोपी कॉलेनोस्कोपी**
- पोटविकार (काविळ, लिव्हर सिरोसीस)
- आतड्यांचे विकार इ.

**बालरोग अतिदक्षता विभाग**

MJPJAY
PM-JAY
अंतर्गत मोफत उपचार उपलब्ध

**अद्यावत एक्स-रे व सोनोग्राफी विभाग**
**२४ तास कार्यरत पॅथॉलॉजी लॅब**







24/7 Emergency Services




**तज्ञ डॉक्टर्स**

**डॉ. प्रशांत गलसिंग राठोड**
M.B.B.S., M.S. (Gen. Surgery), F.M.A.S. FIAGES

**डॉ. सौ. प्रियंका प्रशांत राठोड**
M.B.B.S., DNB (ENT) (मुंबई)
(कान, नाक, घसा तज्ञ)

**डॉ. श्रीकांत गलसिंग राठोड**
M.B.B.S., D.Ortho (मुंबई)

**डॉ. सौ. प्रगती श्रीकांत राठोड**
M.B.B.S., D.G.O. (मुंबई)
(स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ)

**डॉ. महेश रामदास ओहर**
MBBS DNB
हृदयरोग,मधुमेह व अतिदक्षता विभाग तज्ञ

**डॉ. श्वेताली महेश ओहर**
MBBS, MD Pathology
Consultant Pathologist

**डॉ. लक्ष्मीकांत कळंबे**
M.B.B.S., DMRD
(सोनोग्राफी तज्ञ)

**डॉ. विवेक कापसे**
M.B.B.S., DCH
(बालरोग अतिदक्षता विभाग)

दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831
Title code :- MAHMAR52107

# भव्यदिव्य पोलिस स्टेशन व पंचायत समिती इमारतीचे लोकार्पण

## उत्कृष्ट बांधकामाबद्दल कंत्राटदार राजू भाऊ काटे यांचा मंत्र्यांच्या हस्ते गौरव

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**



मेहकर : मेहकर तालुक्याच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या अत्या धुनिक व भव्यदिव्य पोलिस स्टेशन तसेच पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतींचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात आणि दिमा खदार वातावरणात संपन्न झाला. या ऐतिहासिक कार्य क्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी, लोक प्रतिनिधी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. उद्घाटनप्रसंगी उत्कृष्ट दर्जाचे बांधकाम आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज वास्तू उभारल्याबद्दल प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक व कंत्राटदार राजू भाऊ काटे यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले.या सोहळ्यास राज्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार सिद्धार्थ खरात, माजी आमदार संजय रायमुलकर, नगरपरिषद अध्यक्ष किशोर गारोळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक खरात, जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, तहसीलदार निलेश मडके, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अधिकारी, गट विकास अधिकारी दिनकर खरात यांच्यासह जिल्ह्यातील अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.पोलिस स्टेशन आणि पंचायत समिती या दोन्ही महत्त्वाच्या शासकीय इमारतींचे बांधकाम अत्यंत उत्कृष्ट दर्जाचे असून आकर्षक वास्तुरचना, प्रशस्त कार्यालयीन व्यवस्था, सुसज्ज सभागृहे तसेच उच्च दर्जाचे फर्निचर यामुळे या इमारती सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपल व्हाव्यात आणि प्रशासकीय कामकाज अधिक कार्यक्षम व्हावे या उद्देशाने या वास्तूंची निर्मिती करण्यात आली आहे.यावेळी उपस्थित मान्यवरांनी राजू भाऊ काटे यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देत अल्पा वधीत काम पूर्ण करण्याची त्यांची कार्यपद्धती अनुकरणीय असल्याचे गौरवोद्गार मान्य वरांनी काढले. शासकीय विकास कामांमध्ये दर्जा, विश्वासार्हता आणि वेळेचे नियोजन यांचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून त्यांच्या कार्याचा उल्लेख करण्यात आला. बांधकाम क्षेत्रात राजू भाऊ काटे यांनी आपल्या प्रामाणिकपणा, मेहनत, गुणवत्तेची बांधिलकी आणि दूरदृष्टीपूर्ण नियोजनाच्या बळावर स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांनी उभारलेल्या विविध विकास कामांमुळे परिसराच्या प्रगतीला चालना मिळाली असून जनतेमध्ये त्यांच्याबद्दल विशेष विश्वास निर्माण झाला आहे.स्थानिक नागरिकांनी देखील नव्या इमारतींच्या भव्यतेचे आणि गुणवत्ता पूर्ण बांधकामाचे मनापासून स्वागत केले. मजबूत बांधकाम, आकर्षक अंतर्गत सजावट आणि आधुनिक सुविधा यामुळे या इमारती भविष्यात शासकीय वास्तूंसाठी आदर्श ठरतील, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला. सत्काराला उत्तर देताना राजू भाऊ काटे यांनी हा सन्मान आपल्या संपूर्ण सहकारी टीमचा असल्याचे नमूद केले. दर्जेदार काम करणे, शासनाच्या अपेक्षा पूर्ण करणे आणि जनतेला सर्वोत्तम सुविधा उपल करून देणे हेच आपले ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यातही अशाच दर्जेदार विकास कामांद्वारे समाजाच्या प्रगतीत योगदान देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. भव्य वास्तू, विकासाचा नवा अध्याय आणि गुणवत्तापूर्ण बांधकामाचा गौरव अशा विविध पैलूंनी सजलेला हा लोकार्पण सोहळा मेहकर तालुक्याच्या विकास इतिहा सातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. विशेषतः उत्कृष्ट बांध कामामुळे कंत्राटदार राजू भाऊ काटे हे कार्यक्रमाचे आकर्षण बिंदू ठरले असून त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# सावरगाव तांडा ग्रामपंचायतीची वार्डनिहाय आरक्षण सोडत जाहीर

## सात सदस्यपदांचे आरक्षण निश्चित!

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**




जिंतूर : सावरगाव तांडा ग्राम पंचायतीच्या आगामी निवडणुकी साठी वार्डनिहाय आरक्षण सोडत मंगळवारी (दि. ९) ग्रामपंचायत कार्यालयात पार पडली. दुपारी २ वाजता आयोजित बैठकीत विविध प्रवर्गां साठी सदस्यपदांचे आरक्षण निश्चित करण्यात आले. आरक्षण सोडतीनंतर इच्छुक उमेदवारांमध्ये निवडणुकीच्या तयारीला वेग आला आहे. बैठकीस प्रशासकीय अधिकारी म्हणून केंद्रप्रमुख मारुती घुगे, ग्राम महसूल अधिकारी भीमराव वाकळे तसेच ग्रामविकास अधिकारी रत्नमाला जुमडे उपस्थित होते. यावेळी मारुती घुगे यांनी वार्डनिहाय यादी वाचून दाखविली. त्यानंतर चिठ्ठीद्वारे आरक्षण सोडत काढून अधिकृत पणे आरक्षण जाहीर करण्यात आले. ग्राम पंचाय तीच्या तीन प्रभागांतील एकूण सात सदस्यपदां साठी आरक्षण पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

प्रभाग क्र. १ (एकूण जागा – २)
सर्व साधारण महिला – १ जागा
सर्व साधारण – १ जागा

प्रभाग क्र. २ (एकूण जागा – ३)
नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) महिला – १ जागा सर्व साधारण महिला – १ जागा सर्व साधारण – १ जागा

प्रभाग क्र. ३ (एकूण जागा – २)
सर्वसाधारण महिला – १ जागा.
सर्वसाधारण – १ जागा.

या प्रमाणे एकूण सात सदस्य पदांसाठी आरक्षण निश्चित करण्यात आले. आरक्षण सोडतीची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडली. बैठकीस ग्रामसभेचे सदस्य, इच्छुक उमेदवार तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरक्षण जाहीर झाल्यानंतर ग्रामपंचायत निवडणुकीच्या राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# आरोग्य विभागात ४ हजार १९३ कर्मचाऱ्यांच्या पारदर्शक बदल्या

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**



बुलढाणा : सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदली प्रक्रियेत यंदा प्रथमच समुपदेशनाधारित, पारदर्शक आणि तंत्रशुद्ध पद्धतीचा अवलंब करण्यात आला. राज्यातील ४ हजार ५०६ बदलीपात्र कर्म चाऱ्यांपैकी ४ हजार १९३ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी शिफारसी करण्यात आल्याने ही प्रक्रिया राज्य प्रशासनातील आदर्श उपक्रम ठरली आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया राबविण्यात आली. कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता, पसंतीक्रम, दुर्गम भागातील सेवा, वैद्यकीय तसेच कौटुंबिक परिस्थितीचा विचार करून बदल्या करण्यात आल्याने राज्य भरातील कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोग्य विभागाचे प्रधान सचिव, सचिव-२, आयुक्त आरोग्य सेवा यांच्या मार्गदर्शना खाली आणि संचालक आरोग्य सेवा (प्राथमिक) डॉ. विजय कंदेवाड यांच्या प्रशासकीय नियोज नातून संपूर्ण प्रक्रियेचे बारकाईने नियोजन करण्यात आले. प्रत्येक परिमंडळा साठी स्वतंत्र वेळा पत्रक, मार्गदर्शक सूचना, व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे मार्गदर्शन, हरकतींचे तत्काळ निवारण आणि प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरण यामुळे पारदर्शकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यात आली. राज्यातील छत्रपती संभाजीनगर परिमंडळ, नागपूर, अकोला, नाशिक, कोल्हापूर, पुणे, लातूर आणि ठाणे या परिमंडळांसह विविध विशेष आरोग्य संस्थां मध्ये १३ ते २३ मे २०२६ या कालावधीत समुपदेशन प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली. बदली प्रक्रियेत परिचारिका संवर्गातील १ हजार ५७५, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) संवर्गातील ८०८, कनिष्ठ लिपिक संवर्गातील १९७, औषध निर्माण अधिकारी संवर्गातील १६० आणि प्रयोग शाळा सहाय्यक संवर्गातील १४९ कर्मचाऱ्यांच्या बदल्या निश्चित करण्यात आल्या. कर्मचारी संघटनांनीही या प्रक्रियेचे स्वागत करत पारदर्शकतेबाबत समाधान व्यक्त केले आहे. या प्रक्रियेत रिक्त पदे आणि बदलीपात्र कर्मचाऱ्यांची यादी संकेतस्थळ तसेच नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली. राज्य स्तरीय निरीक्षकांची नियुक्ती करून प्रत्येक टप्प्यावर देखरेख ठेवण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या प्रतिक्रिया समाज माध्यमांवर प्रसिद्ध करण्यात आल्याने प्रक्रियेबाबत विश्वास वाढला आणि कोणत्याही प्रकारच्या संभ्रमाला वाव मिळाला नाही. आरोग्य विभागातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही प्रक्रिया न्याय्य, विश्वासार्ह आणि कर्मचारी हिताची असल्याचे सांगितले. शासनाच्या धोरणात्मक निर्णयाची प्रभावी अंमल बजावणी करून सार्वजनिक आरोग्य विभागाने कार्यक्षम प्रशासनाचा आदर्श निर्माण केल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. यावर्षी बदली प्रक्रियेत कर्मचाऱ्यांचे चांगले सहकार्य लाभल्याने बदल्या अधिक नियोजन बद्ध आणि पारदर्शक पणे पार पाडता आल्याची भावना संचालक आरोग्य सेवा (प्राथमिक) डॉ. विजय कंदेवाड यांनी व्यक्त केली. सार्वजनिक आरोग्य विभागातील ही समुपदेश नाधारित बदली प्रक्रिया भविष्यातील कर्मचारी व्यवस्थापना साठी दिशादर्शक ठरणार असून राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, गतिमान आणि परिणामकारक करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानली जात आहे.या प्रक्रियेत रिक्त पदे आणि बदलीपात्र कर्मचाऱ्यांची यादी संकेतस्थळ तसेच नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली. राज्य स्तरीय निरीक्षकांची नियुक्ती करून प्रत्येक टप्प्यावर देखरेख ठेवण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या प्रतिक्रिया समाज माध्यमांवर प्रसिद्ध करण्यात आल्याने प्रक्रियेबाबत विश्वास वाढला आणि कोणत्याही प्रकारच्या संभ्रमाला वाव मिळाला नाही. आरोग्य विभागातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही प्रक्रिया न्याय्य, विश्वासार्ह आणि कर्मचारी हिताची असल्याचे सांगितले. शासनाच्या धोरणात्मक निर्णयाची प्रभावी अंमलब जावणी करून सार्वजनिक आरोग्य विभागाने कार्यक्षम प्रशासनाचा आदर्श निर्माण केल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

# वसंतनगर येथे शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात संपन्न

**सेवाशक्ती टाईम्स.**
**सुरेश जाधव.**



पोहरादेवी : छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या ऐतिहासिक स्मृती जागविणारा शिवराज्याभिषेक सोहळा वसंतनगर (पोहरादेवी) येथील ग्रामपंचायत कार्यालयात मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन दि. ६ जून रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात ग्राम पंचायत भवन येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. सरपंच गणेश जाधव यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यानंतर ग्रामपंचायत परिसरातील भगवा ध्वजस्तंभाचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर सरपंच गणेश जाधव यांच्या हस्ते भगवा ध्वज फडकावून शिवराज्याभिषेक दिनाचा उत्सव साजरा करण्यात आला. भगवा ध्वज आकाशात दिमाखात फडकताच उपस्थि तांनी 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. यावेळी उपस्थित मान्यवर, ग्रामपंचायत सदस्य आणि कर्मचारीवर्ग यांनी ध्वजाला मानवंदना देत शिव रायांच्या कार्याला अभि वादन केले.आपल्या मनोगतात सरपंच गणेश जाधव यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, दूरदृष्टी आणि लोक कल्याण कारी प्रशासनाचा आदर्श आजच्या पिढीने अंगी करण्याची गरज असल्याचे सांगितले. शिवरायांनी दिलेला स्वाभिमान, न्याय आणि राष्ट्र प्रेमाचा संदेश समाजाला सदैव प्रेरणा देणारा असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रसंगी ग्राम पंचायत सदस्य, कर्मचारीवृंद तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साहपूर्ण वाता वरणात संपन्न झालेल्या या कार्य क्रमामुळे वसंतनगर परिसरात शिवभक्तीचे आणि राष्ट्राभि मानाचे वातावरण निर्माण झाले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक पाथरी या चौकात असलेला हा जीवघेणा खड्डा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहेमद अन्सारी.**



पाथरी परभणी : अहिल्याबाई होळकर पाथरी येथे दुचाकी वाहन चालकाचा किंवा पायी चालणाऱ्या चा एखाद्या वेळेस जीव देखील घेऊ शकतो या खड्ड्या मीवर कसल्याही प्रकारचे झाकण नसून नगर पालिका प्रशासनाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे हा खड्डा पाथरी शहरात पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनचा वाल असल्याचे समजते आज तागायत या ठिकाणी अनेकजण या खड्ड्यात पडले जखमी झाले परंतु कोणीही जबाबदार व्यक्तीने याची जबाबदारी स्वीकारली नाही ही अत्यंत खेदाची बाब आहे विशेष म्हणजे ओंकार हॉस्पिटल कडे जाणारा रस्ता पाथरी शहरात जाणारा रस्ता नगरपालिकेकडे जाणारा रस्ता व भक्त निवास कडे जाणारा रस्ता असा चौफेर रस्त्यांना जोडणारा हा महत्त्वाचा चौक असून साईबाबा रोडवर आहे या ठिकाणी जवळच भाजी मार्केट झाले असून गुरुवारी येथे मोठ्या प्रमाणात गर्दी असते आणि पाथरी शहरातील वाढती लोकसंख्या जर पाहिली तर हा खड्डा निश्चितच एखादा मोठा अपघात घडविणार आहे.

# मराठा सेवासंघातर्फे सर्वधर्मीय गुणगौरव सोहळा उत्साहात साजरा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**योगेश काजळे.**




मलकापूर : मराठा सेवा संघातर्फे मलकापूरत गेल्या कित्येक वर्षा पासून होत असलेल विद्यार्थ्यांचा होत असलेला गुणगौरव सोहळा हा या वर्षी ही अत्यंत उत्साहपूर्वक पार पडला या सोहळ्याला शिक्षण क्षेत्रतील अधिकारी I P S अधिकारी व त्याच बरोबर मार्ग दर्शनात भर पडली ती आध्यात्मिक धार्मिक क्षेत्रातील महाराष्टातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह भ प विशाल महाराज खोले यांची त्यांनी त्याच्या वाणीतून मराठा सेवा संघाच्या कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थ्यांना व त्यांच्या पाल्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व मराठा सेवा संघातील सर्व पदाधिकारी व सर्व कार्यकर्त्यांचे एवढा भव्य दिव्य व सर्व समाजा साठी प्रेरणादायी कार्यक्रम सर्वाच्याच सहकार्याने व एकोप्याने पार पडला त्याबद्दल मराठा सेवा संघ मलकापूर परिवाराचे अभिनंदन केले.

# पर्यावरण संवर्धनासाठी प्रशासनाची तयारी वृक्षारोपण अभियानाचे नियोजन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

बुलढाणा : महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 300 कोटी वृक्षारोपण मोहीम आणि हरित महाराष्ट्र अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने सामाजिक वनीकरण विभाग, बुलढाणा यांच्या वतीने जिल्हास्तरीय नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले. ही बैठक जिल्हा धिकारी कार्यालयात जिल्हा धिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीत जिल्ह्यातील वृक्षारोपणाची उद्दिष्टे, उपल रोपसाठा, लागवडीसाठी योग्य क्षेत्रांची निवड, विविध विभागां मधील समन्वय, जनसहभाग वाढविणे तसेच वृक्षसंवर्धनासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हा धिकारी डॉ. देवरे यांनी वृक्षारोपणा बरोबरच वृक्ष संवर्धनावर विशेष भर देण्याच्या सूचना केल्या. पर्यावरण संरक्षण, जलसंधारण आणि जैवविविधता संवर्धना साठी वृक्षारोपण मोहिमेला लोक चळवळीचे स्वरूप देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच प्रत्येक विभागाने आपल्या कार्यक्षेत्रात अभियानाची प्रभावी अंमल बजावणी करण्या साठी नियोजनबद्ध कृती आराखडा तयार करावा, असे निर्देश दिले. जिल्ह्यातील विविध विभागांकडे उपल असलेल्या जागांचा तपशील संकलित करून विभागनिहाय 'लँड बँक' ३० जूनपर्यंत तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागांना दिल्या. बैठकीस सामाजिक वनीकरण विभाग व वन विभागाचे अधिकारी, उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हा भूमी अभिलेख कार्याल याचे प्रतिनिधी, जिल्हा नियोजन अधिकारी, प्रकल्प अधिकारी (आदिवासी विभाग), जिल्हा कृषी अधिकारी, तसेच विविध विभा गांचे अधिकारी उपस्थित होते.

# वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलांडे पाटील यांचा जिल्हा दौरा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

बुलढाणा : कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड निलेश हेलांडे पाटील हे गुरुवार व शुक्रवार दि. 11 व 12 जुन 2026 रोजी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे.शुक्रवार दि 12 जुन रोजी सकाळी 10 वाजता शासकीय विश्रामगृह येथून मोताळाकडे प्रयाण. सकाळी 11 वाजता तहसिलदार, मोताळा यांनी निश्चित केलेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट. दुपारी 12 वाजता मोताळा येथून नांदुराकडे प्रयान. दुपारी 1.30 वाजता तहसिलदार, नांदुरा यांनी निश्चित केलेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबास भेट. दुपारी 2.30 वाजता साईनुसार अमरावतीकडे प्रयाण करतील.

# महानगर पालिकेच्या जल संपदा विभागाचे मुख्य जलवाहिनीकडे दुर्लक्ष शेकडो लिटर शुद्ध पाण्याचा व्हॉल्व मधून अपव्यय!

## महान अकोला मार्गावरील मुख्य जलकुंभ समोर रस्त्यावर वाहत असते पिण्याचे पाणी



अकोला शहराला दररोज शुद्ध पाणी पुरवठा करणारे हेच ते महान येथील जल शुद्धीकरण केंद्र



महान जल शुद्धीकरण केंद्र इमारत.



महान जल शुद्धीकरण केंद्र इमारत.

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अनिस शेख.**

> **- महापौर शारदा ताई खेडकर मॅडम यांच्या आदेशाकडे जलसंपदा विभागाचे दुर्लक्ष!**
>
> **अकोला महानगर पालिकेच्या जल संपदा विभागाने या कडे गंभीरतेने लक्ष केंद्रित करणे अती महत्वाचे आहे.महान पासून ते अकोला दरम्यान मुख्य जलवाहिनीवर डोळे केंद्रित करून लिकेज् व्हॉल्व ची पाहणी करून त्यावर त्वरीत दुरुस्ती करणे अती आवश्यक आहे.अकोला महानगर पालिकेच्या महापौर खेडकर मॅडम यांनी गेल्या काही दिवसापूर्वी महान येथील जलशुद्धीकरण केंद्राला भेट देऊन तेथील शुद्ध पाण्याची माहिती घेऊन संबंधित विभागाला महान ते अकोला दरम्यान लिकेज् व्हॉल्व ची त्वरीत पाहणी करून दुरुस्ती करावी असे आदेश दिले होते.परंतु महापौर सौ.शारदा ताई खेडकर मॅडम यांचे आदेशाला जल संपदा विभागाने कानाडोळा केल्याचे दिसून येत आहे.**

महान : महान येथून संपूर्ण अकोला शहराला पिण्यासाठी शुद्ध केलेले लाखो लिटर्स पाणी पुरवठा करण्यात येतो.परंतु महान अकोला दरम्यान मुख्य जल वाहिनीवर बसविण्यात आलेल्या व्हॉल्व मधून दररोज हजारो लिटर पाण्याचा अपव्यय होत असून या कडे अकोला महानगर पालिकेच्या जल संपदा विभाग लक्ष न देता जाणीव पूर्वक डोळेझाक करीत असल्याचा आरोप जनतेने केला आहे. अकोला शहराला पाणी पुरवठा करणारी टिटवा फाट्या समोरील मुख्य जलकुंभा समोरील व्हॉल्व लिकेज् असल्याने पिण्याच्या पाण्याची खूप जास्त प्रमाणात गळती सुरु असून या लिकेज् व्हॉल्व मधून शेकडो लिटर शुद्ध पाण्याचा अपव्यय होत असून पाणी रस्त्यावर वाहताना दिसत आहे.महान येथील एक नव्हे तर दोन जल शुद्धीकरण केंद्रात धरणातील पाणी घेऊन त्यावर जल शुद्धीकरण करून पाणी शुद्ध करून पिण्यास योग्य केल्या जाते. पाण्यावर शुद्ध प्रक्रिया झाल्यावर दोन्ही जल शुद्धीकरण केंद्रातून पंपिंग द्वारा मुख्य जलवाहिनीत पाणी सोडल्या जाते.शुद्ध झालेले पाणी संपूर्ण अकोला शहराला पिण्यास पुरवठा केला जातो. महान ते अकोला दरम्यान मुख्य जल वाहिनीवर ठिक ठिकाणी एअर व्हॉल्व बसविण्यात आले असून या मध्ये टिटवा फाट्यासमोरील, तिवसा येथील विद्यालया समोर, दगडपडवा, कान्हेरी सरप आणि खडकी सह अन्य ठिकाणी मुख्य जल वाहिनी वरील व्हॉल्व लिकेज् असल्याने दररोज हजारो लिटर पिण्याचे शुद्ध पाण्याचा अपव्यय होत आहे. परंतु या कडे अद्यापही अकोला महानगर पालिकेच्या जल संपदा विभागाच्या संबंधितांनी लक्ष दिले नसल्याचा आरोप जनतेने केला आहे.या वर्षी उष्ण तापमानामुळे महान धरणाच्या पाणी पातळीत दिवसेंदिवस कमालीची घट होत असल्याने आज ९ जून रोजी महान धरणाची पाणी पातळी २३.६१% वर येऊन पोहोचली आहे. जलसंपदा विभागाच्या संबंधितांनी या कडे जातीने लक्ष देऊन महान ते अकोला दरम्यान मुख्य जल वाहिनीवर बसविण्यात आलेल्या अवैध नळ जोडणी बंद करून आणि लिकेज् व्हॉल्व ची त्वरीत दुरुस्ती करून होणारा पिण्याच्या पाण्याचा अपव्यय बंद करावा जेणे करून भविष्यात अकोला शहर वासियांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणार नाही याची दक्षता घेणे आज रोजी खूप गरजेचे आहे.

# वकिली क्षेत्रात ॲड. प्रशांत जुमडे यांचे दमदार पदार्पण

## भव्य मिरवणुकीत जल्लोष, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**





मेहकर : न्यायासाठीची निष्ठा, सत्यासाठीची वाटचाल आणि समाजा प्रती असलेली जबाबदारी या मूल्यांचा वारसा जपत ॲड. प्रशांत विश्वनाथ जुमडे (BCA, MBA, LLB) यांनी विधी क्षेत्रात अधिकृतपणे पदार्पण केल्या बद्दल परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्यांच्या या यशस्वी वाट चालीच्या प्रारंभा निमित्त भव्य मिरवणु कीचे आयोजन करण्यात आले होते. डीजेच्या दण दणाटात, उत्साह पूर्ण वाता वरणात आणि मित्र परिवार, नातेवाईक तसेच शुभेच्छु कांच्या मोठ्या उप स्थितीत ही मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. यावेळी उपस्थितांनी फटा क्यांची आतष बाजी, घोषणा बाजी आणि जल्लोष करत ॲड. प्रशांत जुमडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. मिरवणुकी नंतर महा मानव भारतरत्न डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभि वादन करण्यात आले. न्याय, समता आणि संविधानिक मूल्यांचे प्रेरणा स्थान असलेल्या डॉ. आंबेडकर यांच्या विचारांना वंदन करत ॲड. जुमडे यांनी आपल्या भावी वकिली कार किर्दीत न्यायाच्या तत्त्वांना सर्वोच्च स्थान देण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ॲड. प्रशांत जुमडे यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवासाचे कौतुक केले. BCA, MBA आणि LLB अशी बहुआयामी शैक्षणिक पात्रता प्राप्त करून त्यांनी विधी क्षेत्राची निवड केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. समाजातील सर्व सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्या साठी आणि कायद्याच्या माध्य मातून सामाजिक बांधिलकी जपण्या साठी ते निश्चितच महत्त्वपूर्ण कार्य करतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. मित्र परिवार, नातेवाईक आणि शुभेच्छुकांनी ॲड. जुमडे यांना पुष्पगुच्छ देऊन तसेच शुभेच्छा व्यक्त करून त्यांच्या उज्ज्वल भवितव्या साठी सदिच्छा दिल्या. कार्यक्रमात अनेकांनी त्यांच्या मेहनतीचे, चिकाटीचे आणि अभ्यासू वृत्तीचे कौतुक करत त्यांना भावी वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. विधी व्यवसायात पदार्पण करताना ॲड. प्रशांत विश्वनाथ जुमडे यांनी न्याय व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करण्या साठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यांच्या या यशस्वी सुरुवाती मुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनं दनाचा वर्षाव होत आहे. ॲड. प्रशांत विश्वनाथ जुमडे यांना विधी क्षेत्रातील नव्या वाटचाली साठी हार्दिक शुभेच्छा आणि उज्ज्वल भवितव्याच्या मनः पूर्वक शुभकामना!

# दारव्हा बस आगार व वाहतूक शाखेची दमदार मोहिम कामगिरी

## १४ अवैध प्रवासी वाहनावर कडक कारवाई

**सेवाशक्ती टाईम्स.**
**श्याम राठोड.**



दारव्हा : राज्य परिवहन महा मंडळाच्या बस स्थानक परिसरातील २०० मिटर नो पार्किंग झोन मधील अवैध वाहतूक हटविण्या साठी वरिष्ठांच्या आदेशाने दि .५ ते १५ जून या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या संयुक्त मोहिमेत दारव्हा आगार व्यवस्थापक व वाहतुक पोलीस शाखेच्या वतीने १४ अवैध प्रवासी वाहनांवर दंडात्मक कार्य वाही करण्यात आली आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी यांच्या आदेशावरून परिवहन महामंडळाच्या राज्य परिवहन, यवतमाळ विभागातील सर्व बस स्थानक परिसरातील २००मिटर नो पार्किंगझोनमध्ये गोंगाट करीत धुमाकुळ घाल णाऱ्या व महामंडळाचे आर्थिक नुकसान करणाऱ्या खासगी अवैध प्रवाशी वाहनांवर कार्यवाही करण्यासाठी दि ५ जून ते १५ जून या कालावधी दरम्यान आले तर जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक देवकते साहेब यांच्या मार्गदर्शना खाली वाहतुक सहाय्यक पोलीस निरीक्षक, तर आगार व्यवस्थापक नितीन झाडे यांच्या संयुक्त पथकाने, मोहिमेची अंमल बजावणी करीत दारव्हा बसस्थानक परिसरातील २०० मिटरच्या आतील नो पार्किंग झोनमध्ये आढळून आलेल्या एकंदरित १४ खासगी अवैध प्रवाशी वाहनधारकांवर दंडात्मक कार्यवाही केली. या कार्यवाही मुळे एसटी महामंडळाला आर्थिक कमाईत वाढ होऊन महामंडळाची आर्थिक भरभराट होणार असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत. या मोहीमच्या दमदार कामगिरीत कार्यरत केले,( कार्य शाळा अधीक्षक निकेश उघडे,( वाहतूक अधीक्षक बाळकृष्ण मेश्राम, वाहतूक निरीक्षक सोनाली पवार,( वरिष्ठ लिपिक उमेश चव्हाण, (वाहक शेखर सेवने, (ट्राफिक पोलीस इमरान खान, खंडारे मॅडम (वाहतूक नियंत्रक कैलास धोटे, ( लिपिक पवन इंगळे, या पथकांनी दारव्हा आगार शाखेनी दमदार मोहीम राबवीले आहे.

# एस टी को ऑपरेटिव्ह बँक शाखा अकोला येथे नामदार प्रतापजी सरनाईक परिवहन मंत्री यांची सदिच्छा भेट

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भारत चव्हाण.**



सारकिन्ही : आज दिनांक ८ जून २०२६ रोजी सकाळी साडे दहा वाजता अकोला बस स्थानक नंबर दोन येथे स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव बँक लिमिटेड महाराष्ट्र राज्य शाखा अकोला येथे परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक यांची सदिच्छा भेट बँकेच्या इतिहासात पहिल्यांदाच मंत्रि महोदयांनी एसटी बँकेवर केलेलं लक्ष हे राज्य परिवहन महा मंडळातील कर्मचारी अधिकारी व एसटी बँकेच्या सभासदांसाठी अविस्मरणीय क्षण न भूतो न भविष्यती आज अनुभव असायला यामधून परिवहन मंत्री महोदयांची एसटी बँकेच्या सभासदांना एसटी कर्मचाऱ्यांना सर्व प्रकारच्या बँकेमार्फत सुख सुविधा सदैव मिळाव्या या उदात हेतूने बँकेला दिलेली ही भेट बँक संचालक बँकेचे अधिकारी कर्मचारी आणि सभासदांमध्ये अति उत्साहाचे वाता वरण एसटी बँकेला स्वातंत्र्या पासून आजपर्यंत प्रथमच सन्माननीय उपमुख्यमंत्री एकनाथ रावजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वात डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शना खाली आणि विशेष सहकार्य परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक साहेब यांच्या देखरेखी अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात या बँकेमध्ये भगवा फडकलेला आहे आणि एक हाती सत्ता शिव परिवहन सेनेच्या सर्व संचालक मंडळांच्या वतीने संपूर्ण महा राष्ट्रभर या बँकेवर भगवा फडकून या बँकेला व सभासदांना आजपर्यंत झालेल्या गैरसोय त्या पूर्ण करण्यासाठी सदैव कटिबद्ध राहू त आणि बँकेला वेळोवेळी सर्वतोपरी मदत करू असे आश्वासन आज अकोला शाखेला दिलेल्या भेटी दरम्यान मंत्री महोदय यांचे काढलेले उद्गार याप्रसंगी एसटी बँकेचे संचालक श्री संतोष राठोड सर्व अधिकारी कर्मचारी यांच्यावतीने शाल श्रीफळ व गोमातेची प्रतिमा अर्पण करून गजानन महा राजांच्या प्रतिमेचे पूजन करून छोटे कानी केलेला सत्कार आणि एसटी बँकेवर संचालकांना सभासदांना केलेली मदत ही अविस्मरणीय मदत म्हणून त्यांचे कोटी कोटी आभार धन्यवाद सर्व प्रमुख पाहुणे शिवसेनेचे सर्व नेते आजी - माजी कार्यकर्ते पदा धिकारी सर्वांच्या समक्ष प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम करण्यात आले. सभासदांच्या वतीने ठेवीदारांच्या वतीने कर्जदारांच्या वतीने आणि खातेदारांच्या वतीने मान्यता आले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी आमदार सुभाष भोईर यांच्या घरी दिली सदिच्छा भेट

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अमित जाधव.**



डोंबिवली : श्री पिंपळेश्वर महादेव भक्त मंडळ डोंबिवली आयोजित कृतज़ता सोहळा व जाहीर सत्कार कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस डोंबिवली येथे आले असताना त्यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष, आमदार रविंद्र चव्हाण यां सोबत माजी आमदार सुभाष भोईर यांच्या शिळफाटा येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली . माजी आमदार सुभाष भोईर याच्या कुटुंबियांकडून मुख्य मंत्र्यांचे औक्षण करून स्वागत केले तसेच शाल व पुष्प गुच्छ देवून संपूर्ण परिवाराने सत्कार देखील केला. माजी आमदार सुभाष भोईर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत भारत गिअर ते कल्याण फाटा व कल्याण शिळ रोड वरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी भारत गिअर ते काटई उन्नत मार्गाचे काम पूर्ण करून पहिला टप्पा लवकरात लवकर सुरु करण्याची व मंजूर असलेले विकास बाह्य रस्ते (डीपी रोड ) यांसाठी निधी उपल करून देण्याची मागणी केली त्याच बरोबर दिवा शहरासाठी मंजूर असलेले स्वतंत्र दिवा पोलिस स्टेशन सुरु करण्याची विनंती देखील केली. तसेच कल्याण फाटा येथे प्रगती पथावर असलेल्या श्री दत्त मंदिरासाठी अतिरिक्त निधी मिळावा अशी मागणी प्रदेशाध्यक्ष, आमदार रविंद्र चव्हाण व माजी आमदार सुभाष भोईर यांनी प. पु. डी. के. दास महाराज सेवा प्रतिष्ठान ट्रस्ट च्या माध्यमातून केली या वेळी मुख्यमंत्र्यांनी तत्काळ बैठक लावण्याचे आदेश दिले व कोणत्याही प्रकारच्या निधीचि कमतरता पडणार नाही याची ग्वाही दिली. प्रसंगी नगरसेवक दिपेश म्हात्रे, महेश पाटील, नगरसेविका वेदिका साहिल पाटील, पूजा योगेश म्हात्रे, प्रतिक्षा जयेश पाटील भाजपा पदाधि कारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ग्रॅपलींग स्पर्धेमधे हनुमान व्यायाम शाळेचा प्रणय बावस्कर ब्रांझपदकाचा मानकरी; गुवाहाटी आसाम येथे पार पडलेल्या स्पर्धेत वरणगावला पहिल्यांदा मिळाले पदक

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अरुण धनगर.**



वरणगाव : आसाम गुवाहाटी येथे दि .२९ मे ते ३१ मे रोजी पार पडलेल्या १९ व्या राष्ट्रीय ग्रॅपलींग चॅम्पीयन २०२६ स्पर्धेमधे ६६ किलो गटात येथिल श्रीहनुमान व्यायाम शाळेच्या प्रणय संजय बाव स्करने तृतीय क्रमांक मिळविला असुन त्याने वरणगाव साठी प्रथमच ब्राँझ पदक मिळविले आहे. ग्रॅपलिंग हा खेळ नो-गी व गी या प्रकारात मल्ल युद्धा सारखा खेळला जातो .आसाम मधील गुवाहाटी मधील दिसपूर येथिल भुगेश्वरी फुकोनानी इनडोअर स्टेडीयम मधे या स्पर्धा दि .२९ मे ते ३१ मे दरम्यान घेण्यात आल्या . राष्ट्रीय स्तरावर पार पडलेल्या या स्पर्धांमधे भारतातील २४ राज्यातील ५६७ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. नाशिक विभागाचे संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक दुष्यंतराजे देशमुख यांचे सोबत सदर स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ दि .२६ मे रोजी रवाना झाला होता त्यामध्ये जिल्ह्यातून प्रणय बावस्कर याने सहभाग घेऊन तो ब्रांझ पदकाचा मानकरी ठरला आहे .त्याच्या गटात मार्टिन रोमिंग (अरुणाचल प्रदेश ) याने एक क्रमांक मिळवून सुवर्णपदक प्राप्त केले. तर आदित्य केशव (केरळ )हा दोन क्रमांक मिळवून रजत पदकाचा मानकरी ठरला. तर प्रणय बावस्कर (महाराष्ट्र वरण गाव ) याने तृतीय क्रमांक मिळवून वरणगाव साठी आज पर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदाच ब्रांझ पदक मिळविले आहे .त्यामुळे त्याचे दिनांक २५ मे रोजी आगमन झाल्यावर येथील रेल्वे स्टेशन परिसरातून हनुमान व्यायाम शाळेपर्यंत ढोल ताशाच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली होती . या कालावधीत त्याने या खेळाचे प्रशिक्षण सुद्धा घेतले आहे . त्याला वस्ताद नामदेव मोरे टीम कोच संजय बावस्कर 'दिलीप संगेले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचा चंद्रकांत बढे सर व श्री हनुमान व्यायाम शाळेचे अध्यक्ष सुनिल काळे 'नामदेव मोरे बाळासाहेब चव्हाण , प्राध्यापक भागवत निकम, संजय तायडे, महेन्द्र इंगळे, किरण साळवे ,एकनाथ भोई' दिनेश देशमुख' संजय चौधरी उत्तम भोई, 'संदीप चुडामण धनगर' दिलीप मराठे, प्रशांत निकम, राज निकम, नरेन्द्र भोई, रमेश निकम, रमेश मराठे ,श्रीराम भोई 'भैय्या सोनवणे' शे .ईस्माईल ,महेश सोनवणे सुनिल बापू देशमुख' चाळीसगाव तसेच सर्व तालुका कमिटी सदस्य व व्यायाम शाळेचे संचालक यांनी सत्कार केला.

# बामणी येथे शाळेजवळील किराणा दुकानावर पोलिसांचा छापा १७ हजारांचा गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ जप्त

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**




जिंतूर : महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधी तंबाखू व गुटख्याची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या बामणी येथील एका किराणा दुकानावर पोलिसांनी धडक कारवाई करत १७ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दुकानदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयाने त्याला एक दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहिती नुसार, बामणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळे जवळ असलेल्या जाधव ट्रेडर्स या किराणा दुकानात शासनबंदी असलेल्या सुगंधी तंबाखू व गुटख्याची विक्री होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार ८ जून रोजी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास पोलिसांनी पंचांसमक्ष दुकानावर छापा टाकला.या कारवाईदरम्यान दुकान चालक ज्ञानेश्वर दत्तराव जाधव (वय ४७, रा. बामणी, ता. जिंतूर) हा प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करताना आढळून आला. पोलिसांनी त्याची अंगझडती तसेच दुकानाची तपासणी केली असता मोठ्या प्रमाणावर गुटखा, बिड्या आणि विविध कंपन्यांच्या सिगारेट्सचा साठा जप्त करण्यात आला.जप्त मुद्दे माल कारवाईत गोवा गुटख्याची पाकिटे व खुल्या पुड्या, विविध प्रकारच्या बिड्या तसेच गोल्ड फ्लेक, ब्रिस्टोल, इंडिस मिंट, लव्ह क्रश, मोदी गोल्ड फ्लेक आदी कंपन्यांच्या सिगारेट्स असा एकूण १७ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शाळेच्या १०० यार्ड परिसरात प्रतिबंधित पदार्थांची विक्री केल्याप्रकरणी पोलीस हवालदार सुरेश सखाराम कु-हे यांच्या फिर्यादीवरून ज्ञानेश्वर जाधव याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज सुरवाडे, पोलीस उपनिरीक्षक प्रबोधन जोंधळे, ढाले व ढेंगळे यांच्या पथकाने केली. या सर्व प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रबोधन जोंधळे करीत आहेत.